सं.फौ.ख.क्र. ५४४/२०२२
शासन – वि. – उमेश
निशाणी क्र. १५ खाली
सी.एन.आर. क्र.: MHWS090010642022

# न्या य नि र्ण य
(अधिघोषीत दि. २० मार्च २०२४)

आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम,१९४९–कलम ६५ (ई) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला भरण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला आणि आरोपींतर्फे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

३. आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ एक साक्षीदाराला तपासले. अभिलेखावर आरोपींविरुध्द पुरावा आला नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम–३१३(१)(ब) अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

४. वरील प्रकरणाचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उद्भवतात व त्यावरील निष्कर्श कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्श |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे शाबित करतो का की, दिनांक २५.०४.२०२२ रोजी १२:३० वाजताचे दरम्यान ग्राम–रुद्राळा ता. मानोरा, जि. वाशिम येथे आरोपी १५ लिटर गावठी हात भट्टीची दारु विनापरवाना बेकायदेशिर रित्या बाळगतांना मिळून आला ? | ....नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## – कारणमिमांसा –

<u>मुद्दा क्र.१ व २ करीता :</u>

५. सदर प्रकरणामध्ये आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ एक साक्षीदाराला तपासले. सा. क्र.१ कैलास घुलाजी चक्रनारायण हे घटनास्थळ / जप्तीपंच साक्षीदार आहेत. सदर साक्षीदाराने त्याच्या पूराव्यात अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. त्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराला उलट तपासणीच्या स्वरूपात प्रश्न विचारले, परंतु, अभियोगपक्षाला उपयोगात येईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

६. अभियोगपक्षाला पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्ष प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि तपासी अधिकारी यांचा पूरावा नोंदवू शकला नाही. दारूबंदी छापा प्रकरणात रासायनिक पृथक्करणाचा अहवाल अतिशय महत्वाचा असतो. त्या अहवालावरूनच जप्त करण्यात आलेले द्रव्य हे दारू आहे की काय ही बाब सिध्द होईल. परंतु, या प्रकरणात रासायनिक पृथक्करणाचा अहवाल सिध्द झालेला नाही. त्यामुळे जप्त असलेले द्रव्य हे दारू होती की काय ही बाबच संशयाच्या भोवऱ्यात सापडते. याप्रकरणात अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला पंच साक्षीदाराचा पुरावा उपयोगाचा नाही, म्हणून दारू पंचांच्या समक्ष आरोपीकडून जप्त करण्यात आली होती ही बाब सिध्द होत नाही. तसेच रासायनिक पृथक्करणाचा अहवाल सिध्द न झाल्याने या साक्षदाराचा पुरावा अभियोगपक्षास विशेष सहाय्य होत नाही. रासायनिक पृथक्करणाच्या अहवाला अभावी अन्य साक्षीदारांना तपासण्याचा देखील अभियोपक्षास उपयोग होणार नाही. त्यामुळे रासायनिक पृथक्करणाच्या अहवाला अभावी अभियोगपक्षास आरोपीविरूध्द दोषारोप सिध्द करता येत नाही. करीता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

सं.फौ.ख.क्र. ५४४/२०२२
शासन – वि. – उमेश
निशाणी क्र. १५ खाली
सी.एन.आर. क्र.: MHWS090010642022

## आ दे श

१. आरोपी नामे उमेश चरण राठोड, रा. ग्राम–रुद्राळा, ता. मानोरा जि.वाशिम यांची महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५(१) नुसार दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी रक्कम रू.१५,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

स्वा /-

( ज. तु. कोरेगांवकर )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), मानोरा

मानोरा
दिनांक : २०.०३.२०२४

सं.फौ.ख.क्र. ५४४/२०२२
शासन – वि. – उमेश
निशाणी क्र. १५ खाली
सी.एन.आर. क्र.: MHWS090010642022

**Certificate**

I affirmed that, the contents of this PDF file judgment are same word to word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. R. K. Chavhan (Grade-III) |
| Court Name | : | J. T. Koregaonkar<br>C.J.J.D. & J.M.F.C., Manora. |
| Judgment signed by P.O. | : | 20/03/2024 |
| Judgment uploaded on | : | 20/03/2024 |